# षौक

चौधरींची जातच तशी ! षौकीन मिजाज ! काय एकेक षोक ! मनात आला म्हणजे आला ! तो जाणार नाही। आणि आला म्हणजे तो पुरा केलाच। भले जग इकडचे तिकडे होवो। आभाब कोसळो। त्यांच्या या षौकिन मिजाज तबियती मुकेकित्येक म्हणी, वाक्प्रचार आणि लोककथा पण अस्तित्वात आल्या ! पण चौधरींना त्याच कांही वाटत नाही।

हॉं, वडाच तेल वांग्यावर, किंवा शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड अशा म्हणींबाबत सगळेच चौधरी नाराज होते, त्यांच्या मते या म्हणी त्यांच्यावर जळणा-या लोकांनी पसरवल्या होत्या. पण तरीसुद्वा त्यांना उत्तर देणं क्रमप्राप्त होत. मग चौधरींनी आपल्या जातीतील कांही भाईबंदांना या कामी लावल. त्यांनी एकेक नव्या म्हणी गढल्या आणि पसरवल्या. त्यांचं म्हणी पसरवण्याच तंत्र एवढ अफाट होत की या म्हणी लग्गेच लोकांच्या मनात भरल्या . आता ते पण म्हणू लागले - ये दिल मांगे मोर, किंवा कर लो दुनियॉं मुट्ठी में। कांही म्हणी "सनसनाती ताजगी" ने भरल्या होत्या, तर ळांही "ठंडा, ठंडा, कूल, कूल" होत्या।

हे एवढ काम संपवल्यावर चौधरी पुनः एकदा आपल्या जुन्या षौकाकडे वळले. हा षौक होता घोडे जेरबंद करून त्यावर लगाम कसण्याचा यासाठी हवे असलेले कसब चौधरींकडे होते. जो घोडा जेवढा जिद्दी -त्यावर लगाम घालण्यांत तेवढीच मजा। आता चौधरींच्या अश्वशाळेत एकापेक्षा एक भारी जातीचे घोडे होते आणी तरीही त्यांचा घोडे जमवायचा षौक संपत नव्हता.

सांगणारे सांगतात चौधरींचा हा षौक खरा सुरू झाला तो गाढवांमुके. झाल असा, की चौधरींकडे आधी तट्टू होते. त्यांच्यावर बोझा वाढत गेला - वाढत गेला आणि पेलेना झाला तेंव्हा कोणीतरी चौधरींना सल्ला दिला - तुमच्या कडील तट्टाणींना गाढवांजवळ ठेवा - त्यामुवे जी प्रजा पैदा होईल त्यांची बोझा वाहण्याची क्षमता जास्त असेल. पण चौधरींच्या गांवांमधे गाढव नव्हती. शोध घेता कळल की कुंभारांच्या गांवात गाढव आहेत पण त्यांच्यावर धोबी देखील सामूहिक मालकी सांगतात. तर मग अशीं गाढव मिळवण्यासाठी कांय करावे?

अशा प्रश्नांसाठी चौधरींकडे भरपूर कन्सल्टंट होते. त्यांनी पहाणी करून सल्ला दिला - कुंभारांच्या भांडया - कुंड्यांची , गाडग्या - मडक्यांची विक्री फारशी होत नाही. अमुक अमुक तंत्र वापरा.

झाल ! कुंभारांना निमंत्रण गेल - चौधरीकंडे एवढ्या गाडग्या -मडक्यांची - गरज आहे, माल घेऊन या!

सगळे कुंभार गाढवांवर - आपापली भांडी लादून चौधरींच्या दारांत हजर झाले. चौधरींनी सूप प्रेम दाखवत त्यांचे स्वागत केले. त्या प्रेमाने कुंभार भारावून गेले. त्यांच्या प्रमुखाने कृतज्ञता पूर्वक म्हटले - सरकार, माल आपल्या समोर आहे, किंमत ठरवा आणि माल ताव्यांत ध्या.

माल आपल्या समोर आहे, किंमत ठरवा आणि माल ताव्यांत ध्या. चौधरींनी **आपले जाळ** फेकायला सुरूवात केली - किंमत रास्तच देऊ कुणपेक्षाही कमी नसेल. तुमच्यावर आतापासून कधीही उपाशी रहाप्याची वेळ येणार नाही -हीच किंमत समजा.

आपली मर्जी!  कुंभार - प्रमुखाने हात जोडले.

तर मग ठरल - गाढवामागे दोन मण धान्य.

कुंभरांना धन्य वाटल. घरात धान्य धुन्य भरून राहील याची खात्री पटली. प्रमुखाच्या इशा-याबरोबर - गाढवांच्या पाठीवरून ओझी उतरायला घेतली. गाढवांना मैदानात सोडून स्वतः सावलीत आराम करत बसले. संध्याकाळ झाली तशी आपापली गाढव हाकून एकत्र आणली आणि निघायच्या तयारीला लागले.  त्याबरोबर चौधरींनी कडक स्वरांत विचारले - गाढव कुठे धेऊन चालले?

"आमच्या गांवी!"  कुंभार उत्तरले.

वारेवा । आम्हीं ती कधीच विकत धेतली आहेत.

कुंभारांना कांही कळेचना. कुंभार प्रमुख पुढें आला -

सरकार, याला कांय म्हणायचे.

चौधरी प्रमुख आपल्या मिशांमधे हसला - म्हणाला - अरे, बाबा, कांय किंमत ठरली होती - गाढवामागे - दोन मण धान्य!

पण सरकार, ते गाढवांवरील बोझ्याबद्दल होत.

छे, छे, गाढवामागे दोन मण धान्य - हीच बोली होती. आता गाढवं इथेच रहातील. तुम्हाली धान्य हव की नको ते तुम्ही  ठरवा आम्ही कौल दिला आहे - तुम्हाल उपाशी - राहू देणारा नाही.

कुंभारांना काही कळेना. पण एक कळत होत. चौधरींच्या गांवात येऊन, तिथपर्यंत पोचवलेली गाढवं परत घेण अशक्य होत.

कुंभारांनी आपापल्या वाट्याचे दोन-दोन मण धान्य उचलले आणि मुकाट्याने गांवाकडे रवाना झाले.

कुंभार गांवा बाहेर जाताच चौधरींचे गांव सगळ्यांच्या सातमजली हास्याने दुमदुमून गेले.  तेवढ्यातच कुणीतरी सगळी गाढवं तट्टांच्या अस्तबलात आणली. त्याबरोबर तिथेही खळबळ माजली.  नर तट्टू खट्टू झाले. पण तट्टाणींनी गाढवांच स्वागतच केल. त्यावटन पुनः हास्याच्या लकेरी उमरुल्या.

तट्टाणीं आणी गाढवं याच्यातून जी नवी प्रजा जन्माला आली तिच्यात किती तरी गुण होते.  त्यांना पाळीव करण्यासाठी कित्येक सईस बहाल झाले. त्यांनी यांना   कित्येक कसरती शिकवल्या.

नवीन प्रजाति आणायच्या.

आता चौधरींचे गांव घोडामय झाले. जिथे कुठे घोड्याची नवी जात असल्याची कुणकूण आली की चौधरी तिकडे गेलेच आणी कसही करून तो नवा घोडा अस्तबलात आणलाच म्हणून समजा. एकदा चौधरींच्या एका दोस्त गांवातून एक विशेष घोडा त्यांना नजराणा म्हणून देण्यांत आला. घोडा अडेल होता. नवीन अस्तबलात त्याने असा उधम केला की ज्याचे नांव ते. सगळे सईस हरले. शेवटी कांही तरूण चौधरींनी घोडयाला सरळ करण्याचा विडा उचलला. त्याच्या मानेत दोरीचा फास टाकून आधी त्याला जेरबंद केले. त्याच्या टापांवर नाल ठोकली. मगा चाबकाने मारून मारून त्याची साल सोलून काढली. एवढ झाल्यावर घोडयाने गुडघे टेकले आणि सुतासारखा सरळ झाला.

चौधरींच्या दृष्टीने हा विजय बराच मोठा होता. अशा प्रकारे त्यांना कुठल्याही अडेल घोड्याला वठणीवर आणायचा मंत्रच सापडला. त्याबरोबर त्यांचा षौकही बदलला. आता फक्त नव्या जातीच्या घोड्याला अस्तबलात आणून बांधणे एवढे पुरेनासे झाले. तो घोडा सरळ असेल, तर चौधरींना त्याच्यात रस वाटेना. अडेल घोडा पाहिजे - त्याल वठणीवर आणायचा खेळ जितका दमछाक करणारा असेल - तितका तो चांगला.

अशा प्रकारे षौक वाढत असतांनाच एका ठिकाणी आठ मोठ्यांच्या संमेलनात चौधरींनी एक शानदार घोडा बधितला. एवढा शानदार घोडा आपल्या अस्तबलात नाही याचे त्यांना वैषम्य वाटू लगले. घोडा कुणाचा? हा पत्ता लावताना कळल की तो लालबाबूंचा घोडा होता. जात होती तुर्कमीनिया. एक तर खुद्द लालबाबू कडक - त्यांत हा घोडा तर महाकडक. लालबाबू - तर नावशिखांत लाल होतेच घोडाही कांही कमी नव्हता तोही गहि-या बदामी रंगाचा होता. एकीकडे लालबाबू लालबाबूचा रुबाब होता तर दुसरीकडे हा तुर्कमीनीया घोडा गटकावायची दुर्दम्य इच्छा चौधरींना स्वस्थ बसू देईना.

चौधरींनी पुनः एकदा आपल्या सल्लागार भाईबंदाना या कामावर लावल त्यांनी आता म्हणींच्या ऐवजी अफवांच पीक काढल. लाल्बाबूंच्या गांवात अफवा पसरत चालल्या कधी म्हणत लालबाबू स्वतः पुढे कुणाला किंमत देत नाहीत तर कधी म्हणत - लालबाबूं मुळे सगळ्यांचा जीव धारेवर धरला आहे. एक अफवा पसरली की लाल रंग डोळ्यांना खुपतो - दुसंरी म्हणे - लाल रंगा मुळे ओकारी येते. काही तरूण ओकारी काढत फिरू लगले. वातावरण एवढ बिधडल की लालबाबूंनी कांही दिवस आपला कडकपणा सोडून नरमाईने घेण्याचं ठरवलं. बस्. इथेच त्यांच चुकल. नरमाईच्या एका दिवशी त्यांनी बघितल -सईस त्यांचा घोडा घेऊन जो गेला तो परत **आलाच** नाही. शोध करता कळल की सईस आणी घोडा दोन्हीं चौधरींच्या अस्तबलात आहेत. आता हातावर हात चोळत बसण्यापलीकडे लालबाबू कांही करू शकत नव्हते. तिकडे तुर्कमीनीया घोडा अस्तबलात पोचल्यावर चौधरींना आकाश ठेंगण वाटू लागल. घोडा तर घोडा, पण त्याचा सईस देखील नामी होता. त्याच रात्री गप्पा करताना त्याने ऐकवल - एवढ्या अस्तबलाचा कांय उपयोग ? इथे काबुली घोडा कुठेय् ? अस्तबला भोवती बैठक टाकून बसलेल्या कित्येक चौधरींनी भुवया उंचावल्या. एक वयस्क चौधरी म्हणाले - पण आम्ही तर ऐकल की काबुल मधे घोडे नसतात.

हुजूर, चुकीच ऐकलत - काबुल मधे गाढवं नसतात - पण घोडे असतात.

अच्छा, तुला कसं ठाऊक ?

लालबाबूंबरोबर तिकडे येण जाणं असायच. म्हणून मला ठाऊक आहे की काबुली घोडे असतात आणी वा, कांय असतात ? हा तुर्कमीनीया घोडा त्यांच्या पुढे कांहीच नाही.

आश्चर्य  आहे, आम्हाला कधीच माहीत नव्हत.  त्या घोड्यांचे गुण दोष कसे कळणार ?

सईसाची छाती गर्वाने फुलली - तो म्हणाला - हजूर . लालबाबू त्यांच्यावर फिदा होते.   म्हणून भी पण कित्येक काबुली घोडे हाताळले आहेत. त्यांना कसरत शिकवली आहे. त्यांचे गुण, दोष मल चांगले माहीत आहेत.

चौधरींच्या छातीत ईर्ष्या भरली.   काबुली घोडे या सईसाला माहीन असावेत  आणी आपल्या कडे नसावेत  हे कसें चालणार?  यार दोस्तांकडे चौकशीची सुरुवात झाली. कुणालाच काबुली घोड्यांची फारशी माहिती नव्हती.

पण एक दिवस अचानक एक खब-या आला. त्याने कुजबुजत सांगितले - काबुली घोडे आहेत - पण जेंव्हा त्यांनी चौधरींच्या घोड्यांच्या षौकाबद्दल ऐकल , तेंव्हापासुन त्यांनीं आपले घोडे अज्ञात स्थळी लपवून ठेवले आहेत.

आता चौधरींच्या रागाचा पारा चढला.  अरे, सरळ मार्गा ने दिले असतेत, तर किंमत देऊन खरेदी केले असते तुमचे घोडे.  पण नाही आता आक्रमण करूनच घेणार.

मग काय विचारता ?  चौधरींनी आपापल्या लाठ्या.  काठ्या उचलून आक्रमण केले.  काबुल मधें एवढी धूळ उडवली की ज्याचे नांव ते. पण घोडे दिसेनात. त्या ऐवजी गाढवांची मात्र भरमार होती. याचा अर्थ कांय ? तो सईस खोटं बोलत होता ? खब-यांनी चुकीची खबर पसरवली होती?

चौधरींच्या रागाचा पारा चढला.  घोडे नाहीत तर त्यांचा राग गाढवांवर निघाला.  गाढवांवर लाठ्या काठ्यांची अशी बरसात झाली की ते दुगाण्या. झाडण विसरून पळत सुटले.  आणि तेहीं कुणीकडे?  तर घोडे जिथे लपून राहिले होते तिकडेच.

आपल्या लपायच्या ठिकाणांवर गाढव आणि त्यांच्या मागे चौधरींना पाहून घोडे चरकले.  पण त्यांनी डोकं ठिकाणावर ठेऊन आपला व्यूह आखला.  आधी तर आपल्या खुरानी एवढी धूळ उडवली की ती गाढवांच्या डोळ्यात जाऊन त्यांना दिसेनासे झाले.  तेवढयांत घोडयांनी आपली जागा बदलली.

धुळीने वैतागलेल्या चौधरींनी सूड घेण्यासाठीं एक एक गुहा गुहा, एक एक कंदरा, एक एक दगड शोधला पण एवढ करूनही त्यांच्या हाताला काबुली घोडे लागलेच नाहीत. त्यांना मिळाली फक्त  थोडी फार खच्चरं.

अशा वेळी त्यांचा आत्मलोभ टिकवून ठेवणे गरजेचे होते.  म्हणून त्यांचा मुखिया पुढे आला. त्याने समजावले - नाही मिळाले घोडे म्हणून एवढे भांबावून जाऊ नका.  आज तुम्ही जगाला दाखबून दिले  आहे की आपली ताकत किती आहे.  आता कुठलाही घोडा असेल किंवा वस्तू - लाठीच्या ताकतीने आपण त्याला वश करू शकतो .  जगही आता हे ओळखून  चुकले आहे.

मुखियाच्या त्या वाक्याने सर्व चौधरींची छाती पुनः एकदा गर्वाने फुलून गेली.  आपण बसलेल्या घोड्यांवरच चाबकाचा वर्षाव करून त्यांनी काबुली घोड्यांवरचा राग प्रकट केला आणी गांवी परतले.

असेच कांही दिवस गेले आणी एकदा चौधरींच्या गांवी एक व्यापारी आला - तेलाचा व्यापारी.  त्याच्या चित्र विचित्र पोषाखांतील उंटाला पहाप्यासाठीं पूर्ण गांव होटल.

व्यापाप्याने हात जोडले - साहेब हो, भी तेलाचा व्यापारी आहे - तेल बिकतो. तुमच्या गांवाची कीर्ती ऐकून माझा थोडा माल इथे धेऊन आलो आहे.

तेल शब्द ऐकताच सर्व चौधरीनी कान टबकारले. हा शब्द हल्ली फार महत्त्वाचा झाला होता मुखियाच्या अंगणांत व्यापाप्याल बसबून त्याची विचारपूस सुरू झाली.

मुखिया जेवण करून आताच कुठे उढले होते.  व्यापाप्याची खबर ऐकून दांत कारेत ते अंगणांत आले. आगंतुकावर एक नजर टाकताच त्याना कळल की हा कांही व्यापारी नाही - तेली आहे तेली. याला व्यापार कांय कळणार?  तेही चौधरीं बरोबरचा व्यापार ! ते  कांही सोप नाही महाराजा !

इकडे व्यापारी म्हणवणाप्या त्या तेल्यानेही मुखिया समोर दिसताच त्यांचे गुणगान सुरू केले - तुमच मोठ नांव ऐकल होत.  मोठ्या लोकांची मोठी कामं ! आज भाग्य उजाडल आणी तुमच दर्शन झालं।
ते राहू दे ! मुखियाने दांत कोरणं चालूच ठेवल होतं - हाथ, तोंड धुवून कांही तरी खाऊन पिऊन धे.  मग करू - सौधाची बात ! मुखियाने इशारा करनाच एकाने व्यापाप्या समोर  पाप्याचा लोटा ठेवला. त्यात्तल ओंजक भर पाणी धेऊन व्यापाप्याने आपल्या तोंडावर थोडे से थेब उडवले आणी डोक्याला बांधलेल्या फेट्याच्या टोकाने तोंड पुसले.  हे बधून अंगणांत बसलेले कित्येक चौधरी सकखकून हसू लगले.  एका प्रौढ चौधरीने टोमणा मारला - तोंडावर पाणी शिंतोड तोस की तेल ?  व्यापारी लाजला.  म्हणाला - हुजूर,
आमच्या देशांन पाप्ययाचे दुर्भिक्ष्य आहे,  पाणी जपून वापरायची सवयन्य पडून गेली आहे.

मुखिया तरी जखमेवर मान्य चोळव्याचीं आम्हीं असनांना एखाछा गांवी पाण्यीचं दुर्भिस्य.  बोल, आताच्या आता किती पाणी पाठवू तुझ्या गांवाल?

चौधरींचा विजय असो !  तुमच्या या सूचनेवर तर आम्हीं आमच्या तेलाच्या खाणी पण तुमच्या ताब्यांंत देण्यास तयार आहोत. अस म्हणन आपाप्याने पाप्याचा तांब्या तोंडाला लावण.

मुखियाल पण कळून चुकले की आपल्याल तेलची गरज आहे हे या व्यापाऱ्याल समजले आहे. पण याचे सगळे तेल बाहेर नाहीं काढले तर भी कसचा चौधरी? व्यापाऱ्याचे पाणी पिऊन हाताच तो म्हणाला - तर मग अस करु - तेवढ तेल आम्हाला दे.

व्यापारी म्हणाला - कबूल, कबूल, जेवढ तेल हव मेवढ ध्या.

तेल - पाण्याचा असा मेळ जमल की पाहणारे महातच राहिले. या एका घटनेमुळेच किती तरी म्हणी पुढे आल्या. कोणी म्हणाले - तेल बधा, तेलाची धार बधा- कोणी म्हणाले - तेल्याच तेल जळत, मशालजीचा जीव कळतो.

अशी तेल पाण्याची दिलजमाई चालू असतानाच व्यापाऱ्या ने विनंती केली - चौधरीं चे असाबल बध्याची. तिथे गेल्यावर एकूण रेलचेल पाहून व्यापारी थक्क झाला. तऱ्हे तऱ्हे चे घोडे तालेवार. त्यांचे साईसही तालेवार. पण सगळे कसे शिस्तित. एकही घोडा बेकाबू होऊ शकत नव्हता.

एवटे घोडे जमवल्याबद्दल चौधरीं ची प्रशंसा करीन व्यापाऱ्याने आपला दाव रचला - हुजूर, या सर्व घोड्यांची शान - अरबी घोडा - तो - दिसन नाही कुठे ?

अरबी घोडा - कमाल आहे. आम्ही कधी ऐकलच नाही अरबी घोड्याबद्दल.

हुजूर, आता कांय सांगावे ? आहेत ते आमचेच जातभाई. पण तेही व्यापाराबद्दल अत्यंत नाठाळ आणी त्यांचे घोडे ही अत्यंत लठाळ. आणी विशेष सांगतो - त्यांच्या कडेही तेलाचा भरपूर साठा आहे.

असेल नाठाळ. पण शेवटी तेली तो तेलीच. ते कांय व्यापारी थोडेच होणार? मुखियाने तेवढयातल्या तेवढयांत टोमण हाणला. तेली ही कांही कमी नव्हता. तो म्हणाला - स्वरं आहें हुजूर, तेल्याने किती ही म्हटल तरी तो व्यापारी कसा होणार? किंवा धाणीचा बैल फिरवणाऱ्याने किती ही म्हटल तरी तो चौधरी कसा होणार?

हा टोमणा मुखियाला जरा जास्तच झोंबला.

पण तो अनुभवी होता - गप्प राहून तो विचार करू लागला. काबुली घोड्याच्या बेकी जगभरांत जी शोभा झाली ती अजून विसरली नव्हती. पुढचे पाऊल जपून टाकायल हवे. या व्यापाऱ्याचा तरी कांय भरोसा ? शेवटी तेलीच हा. तेल्यांच डोक पण खतरनाक चालत.

मुखिया एकाएकी गप्प झाल्याने सगळ्यांच्या डोक्यांत खकबळ सुरू झाली. व्यापाऱ्याने दबकत विचाले - सरकार, माझ्या बोलव्यांन कांही चूक झाली कां?

नाही, तस नाहीं. मुखिया म्हणाला . भी जरा अरबी घोड्याचा विचार करीन होतो.

त्यान विचार करण्यासारखे कांय आहे? त्यांच्या कडे देखील पाण्याचा प्रश्न आहेच. आपण त्यांना पाणी पाजा. बदल्यांत त्यांने अरबी घोडे ध्या.

मुखिया कच्चा नव्हता. हा खेळ दिसतो तितका सरळ नाही हे त्याल कळून चुकले. पण छडा लवण्या साठी त्यानें उगीचच विचारले बर, त्या गांवी जायचा रस्ता कुणीकडून आहे?

अरे हुजूर, कांय विचारता? आमच्याच गांवातून तो रस्ता जातो म्हणाल तेंव्हा तुम्हाल त्यांच्या सीम पर्यंत नेऊन सोडू.

ठीक तर मग। आमचा एक माण्स देनो. त्याल सही सलामत त्या गांवात पोचवायची जबाबदारी तुझी. मुखिया ने निर्णय सुनावल.

हा अजब निर्णय जंगलतल्या आभीसारखा सर्वत्र पसरला. त्याच संध्याकाकी मुख्यिाने समजावलेला एक प्रौढ चौधरी तेल व्यापाप्या- बरोबर - निधाल. तो सगकया गांवाचा लाडका पण होता. सर्वांना नक्की खामी होती की हा आपल्या बरोबर अरबी घोडा घेऊनच परतणार. पण झाल उलटच. तो रिकाम्या हातानेच नव्हे तर ह्रदयावर एक ओझ घेऊन परत आल्याच स्पष्ट दिसत होत.

त्याने आल्या आल्या वर्णन केल. अरबी घोडा पाहील. हा खरा जातिवत घोडा. कांय त्याचे शरीर. कांय रग आणी मस्ती ! कांय त्याची आयाक, त्याचे स्नायु, त्याचे पाय, आणी त्याची राजस चाल. बस्स ! ज्याच्या कडे अरबी घोडा नाही त्याच्याकडे कांहीच नाही.

हे वर्णन ऐकणाप्यांच्या ह्रदयावर देखील क्विंटल भर ओझ लदल गेल. परिस्थिती हाताबाहेर चालली हे ओकखून मुखिया ने सर्वांना दडपल - बंद कराते घोडा पुराण. कांय रे, कांय उत्तर दिलं त्यांनी?

ते पप्यासाठी - पाप्याइतकच तेल धायल तयार आहेत. मात्र घोडा कोण त्याही किंयतील नाहीत.

ओ ! त्या तेल्यांची ही मजाल ! कित्येक चौधरींती आपल्या काढया सरसावस्या.

थांवा- यातून मार्ग निघेल जरूर. तोपर्यंत तुम्हा सर्वांनी आपापली बधत रहायच.

थोड्याच दिवसांत मुखियाच्या सुवीक डाक्यांत एक आयडिया आली - आधी

चौधरींनी तेल व्यापाप्या बरोबर तेला ऐवजी पाणी हा सौदा मुजूर करून घेतला. अशा प्रकारे व्यापाप्याच्या देशांत त्यांच जाण येण सुरू झाल. कधी तेलाची खाण पहाप्या साठी तर कधी तेल उपसणप्या रिग्ज्या

तपासणी साठी. इकडे अरबीं छोडयाची माहिती काढण चालूच होत. शेवटी सर्व तयारी पूर्ण झाली तशी मुखिया नें तेल व्यापाप्याल आपस्या मैत्रीचा हवाल देऊन तकाजा केला - आयचे कांही हुषार सईस तुझ्या छारी डेरा टाकून रहातास. रात्री सगक जग झोपल असेल तेंव्हा ते गुपचुप अरबी घोडें घेऊन पळून येतील.

व्यापारी म्हणाला - सरकार, आम्ही सर्व आपल्या शब्दा बाहेर नाही - पण यामधे धोका तर नाही ना होणार? कांही संकट तर नाही येणार!

छर्, कसल धोका न् कसल संकट? आमचें कठैत मग कांय कामाचे? सईसां -

बरोबर तेही येऊन रहातील तुमच्या गांवात. संकटाची चाहूल जरी लगली तरी लाठी मारी करून त्या संकटाला चेचून टाहू.

बस् ही यु-ली सफल झाली. रातो रात अरबी घोडा चौधरींच्या अस्तबलांन बांधल गेल. त्याल यहायल सर्व गांव लोटला. जो बघे तोच म्हणे - सरयू. याच्या एवढ शानदार जनावर पाहिल नव्हल.

अशा घोड्यावर स्वारी बांधण्याचा मोह कसा टाकणार? एक अनुभवी षौकीन चौधरी - उडी मारून घोड्याच्या पाठीवर बसला.

पण हे कांय ? बीज लवलवने त्याप्रमाणे घोड्याने पुढचे दोन्हीं पाय वर उचलले आणी जोरान खिंकाळला. त्यावर बसलेला सवार इतक्या वेगाने जमिनीवर येऊन आपटला की बधणाप्यांच्या जिवाच पाणी झाल. त्याल परकून घोडा जो उसकला तो सरक अस्तबलच्या बाहेर येऊन दौडन सुरला.

हे चौधरींना कस चालणार? त्यांनी सगकीकडून धावाधाव करुन आखिर घोड्याला जेरबंद केलच. मग त्याल इतक बेदम चोपल की घोड्याच्या शरीरातून जागोजागी रक्त वाहू लगले. तरीही त्याचे खिंकाकणे आणी - मस्ती कमी होईना. शेवटी चाबूक घेऊन एक चौधरी पुढे आला तस सईसाने त्याल अडवल - हुजूर, अस करू नका. घोडा दुखावला तर एवढा शानदार घोडा हातातून जाईल.

तर मग कसा काबूत आणायचा? त्याचा दाणागोटा बंद करु या. मग आपोआप ताकयावर येईल.

पण त्याच्या जखमावाहू देत. मच्छर - माशा त्रास देतील तेंव्हा ककेल बच्चमजील - एका चौधरीने दांतावर दात घासत आपल राग व्यक्त केला.

तस मुकीच करू नका - दुसरा अनुभवी सईस उद्शारल. तशाने तो मोलच पण त्याचे रोग पसरून इतर घोडेही तरतील.

हा उतारा लगू पडला. लगेचच घोडयाल मलम - पट्टी करण्यांत आला. पण त्याचं दाण-पाणी मात्र बंद केल.

चार दिवस होतात न. होतात तोच चौधरींना पुनः एकदा अरबी घोड्यावर - सवारी करायची हुक्की आली. अजूनयर्यंत या घोड्यावर नकेल बांधणा आली नव्हती. तेच काम आधी कराव म्हणून चौधरीं नवीन दोर छेऊन आले.

पण घोड्याची रग अजून शमली नव्हती. चौधरींना पाहूल त्याने पुनः असा उत्यात केल की विचारू नका. त्याल नकेत बांधण किंवा त्यावर स्वार होणं कुणाबाच जयल नाही.
मग तिसरा प्रयत्न, मग चौथा - - -. पण जो घोडा सईसांबरोबर साळ वागत होता, तो कांही केल्या अजूनही कुणात्नच पाठीवर बसू हेत नव्हता आणी आयाकीवर हात टाकू देत नव्हता - नकेल त्नवण तर दूरच.

त्यात्न जेरबंद करायचे चौधरींचे प्रयत्न जिनके फसत चालते, तितके त्यांच्यी खिळली उडवणाप्यांची जमात वाढत चालली.

शेवटी मुखियाने निर्णय छेतला - आता हा खेळ संपवत्नच पाहिजे.

दुस-या दिवशी - सर्व जगाने जबर्दस्य धमाका ऐकला. त्याने कानांत आलेस्या झिणझिव्या उतरायत्न कांहींना कित्येक दिवस त्नगले.

दंण धमाक्याची धूळ ओसरल्यावर संर्गव मुखियाकडे धावले तशी मुखियाने सर्वांना समजावले - घोडा पागल झाला की त्यात्न गोपी - धाल्न वीच त्नगते.ण्

थक्क होऊन जगाने हे तत्त्वज्ञान ऐकल आणी अरबी घोडा पागल झाला होता हे कबूल केल. कित्येक गांव शहाणी निधाली. त्यांनी आपले घोडे चौधरींच्या अस्तबत्नन नेऊन बांधलेण

महाराजा ती माणस होती. मात्र जगाने आणखीन एक अप्रूप पाहिले - तमामा काठियावाडी घोडे स्वतःच माना खाली घालून चौधरींच्या अस्तबत्नकडे पळत निधाले होते.

- - - - - - - - - - -

नया ज्ञानोदय - ऑ. २००३

अवधेश प्रीत - उपसंपादक, हिंदुस्तान - पटना

[बिहार - गाजीपुर - नवोदित कथाकार - दीन
कथा संग्रह नृशंस, हस्तक्षेप - प्रकाशित.]